# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१,    दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९

# नैसर्गिक आपत्तीमुदत कर्ज धोरण

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## दिनांक ०१/०१/२०२६ पर्यंत अद्यावत बदलासह कर्ज धोरण

## नैसर्गिक आपत्ती मुदत कर्ज  धोरण

**मा.संचालक मंडळ सभा क्रमांक ४३/१० वी, दिनांक १४/०९/२०१७ ठराव क्रमांक ६७ नुसार मंजूर**

**उद्देश –** नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक नूकसान झालेल्या व्यापारी / व्यवसायक / उद्योजक / दूकानदार यांना वाजवी व्याजदराने मुदत कर्ज पुरवठा करणे.

**पात्रता –**
१) नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक नुकसान झालेले व्यवसायिक / लघुउद्योजक / छोटे मोठे व्यापारी व दुकानदार सदर कर्जास पात्र होतील
२) व्यवसायाकरीता अन्य बँका वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतलेला अर्जदार सदर कर्जास पात्र होणार नाही. यासंबंधी दाखला सादर करणे आवश्यक राहील.

**निकर्ष –**
१) बृहन्मुंबई कार्यक्षेत्रात कायमस्वरुपी वास्तव्य / व्यवसाय असणारी व्यक्ति /व्यवसायिक / उद्योजक / दुकानदार इ. सदर कर्जास पात्र होतील.
२) व्यवसायाची जागा स्वमालकीची किंवा किमान ५ वर्षे अधिकृत भाडे तत्वावर घेतलेली असावी.
३) बँकेचे नाममात्र सभासदत्व घेतलेल्या व्यक्तिस कर्ज पुरवठा केला जाईल.
४) संबंधीत व्यवसायासंबंधी प्रचलित कायद्यानुसार आवश्यक असलेने परवाने नोंदणी दाखले ना हरकत प्रमाणपत्र इ.सादर करणे आवश्यक राहील.
५) पागडी पध्दतीने जागा असल्यास संबंधीताचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**कर्ज मर्यादा –** प्रकल्प खर्चाचे ७५% किंवा कमाल रु.१०.०० लाख

**कर्ज कालावधी** – कमाल ६० हप्त्यांचे मुदत कर्ज

**मोरॅटरीयम –** आवश्यकते नुसार कमाल ६ महिने, सदर कालावधीत मासिक व्याज नियमित परतफेड करणे आवश्यक राहील.

**व्याजदर –** द.सा.द.शे ९.५०%

**प्रोसेसिंग फी** – कर्ज रक्कमेच्या १/२% किवा किमान रु.५५००/– व कमाल रु.१००००/– + कर

### कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे

१) कर्ज मागणी अर्ज (विहीत नमुन्यात)
२) अर्जदाराची के.वाय.सी
३) व्यवसाय परवाने ना हरकत दाखले नोंदणी प्रमाणपत्र जागेची कागदपत्रे (झेरॉक्स प्रती) सादर करावी लागतील व त्याच्या मुळ प्रती कर्ज उचलीचे वेळी शाखेस सादर करावी लागतील.
४) ६ महिन्याचे बँक स्टेटमेंट
५) ३ वर्षिय आय.टी.रिटर्न
६) प्रकल्प अहवाल (सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेला)

**कर्जसुरक्षिततेपोटी द्यावयाचे तारण :-**

१) स्वमालकीची जागा इक्वीटेबल मॉर्गेज, ई.फायलिंग सुविधेअंतर्गत करुन द्यावी लागेल सदर जागेचे मुल्यांकन लिगल बँकेच्या तालिकेवरील तज्ञांकडून करुन घेऊन सदर जागा बोजा विरहीत असलेसंबंधी दाखला सादर करावा लागेल.

२) व्यवसायाची जागा भाडेतत्वावर अथवा पागडी पध्दतीची असल्यास कर्ज रक्कमेइतके अतिरिक्त तारण, उदा.

अ) एल.आय.सी.(सरेंडर व्हॅल्यू कर्ज रकमेइतकी असाईन करुन द्यावी लागेल)
ब) एन.एस.सी. (लिनमार्क केलेले)

क) सोने दागिने इ. स्वरुपात देणे आवश्यक राहील.

**कर्जउचलीचे वेळी घ्यावयाचे दस्तऐवज**

१) वचनचिठ्ठी
२) कर्ज करारनामा
३) लेटर ऑफ लीन ॲण्ड सेट ऑफ
४) डेबीट ॲथोरीटी व अटी व शर्ती मान्य असल्याचे पत्र
५) सातत्य हमीपत्र
६) जागेसंबंधी गहाणखत (ई.फायलिंग सुविधेअंतर्गत नोंदणी केलेले)

**अटी व शर्ती**

१) अर्जदारास बँकेचे नाममात्र सभासदत्व घेणे आवश्यक राहील.
२) सदर व्यवसायाकरीता बँकेच्या पूर्व परवानगीशिवाय अन्य बँका / वित्तीय संस्थेकडून कर्ज घेता येणार नाही.
३) दरमहाचा कर्जहप्ता पुढील महिन्याचे २० तारखेच्या आत भरणा करावा लागेल अन्यथा थकीत रकमेवर २% जादा दंडव्याज आकारले जाईल.
४) दर तिमाही, व्यवसायासंबंधी आर्थिक पत्रके सादर करणे आवश्यक राहील.
५) व्यवसायासंबंधी केव्हाही तपासणी करणेचा अधिकार बँकेस राहील
६) नैसर्गिक आपत्ती संदर्भात अधिकृत शासकीय अधिकाऱ्यांचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
७) इतर बँक खात्याचे १२ कोरे धनादेश शाखेस सादर करणे आवश्यक राहील.
८) मंजूर कर्जाचा विनियोग संबंधीत कारणाकरीताच करणे बंधनकारक राहील अन्यथा कर्ज रक्कम एक रकमी वसूल करणेचा अधिकार बँकेस राहील.
९) व्यवसायासंबंधी मालाचा विमा, बँकेच्या संयुक्त नांवे उतरविणे आवश्यक राहील.
१०) वरील अटीमध्ये जादा अट समाविष्ट करणे, वगळणे, शिथिल करणेचा अधिकार बँकेस राहील.